Comments 2023

मला यात काही मुद्दे प्रस्तुत वाटतात ते असे -- अतिवास्तववादी कविता, अमूर्त वा प्रति-कविता, न-भाषा कविता -- अशी अनेक प्रकारची कविता लिहिली जाणार. त्यात सबोध व अबोध मन एकत्र येणे, सबोध मनाचा कंट्रोल अगदी कमी असणे, निरर्थकतेकडेच कल असणे -- असे प्रकार असणार. त्यांचा सलग थांग लागणे शक्य नाही. तरीही त्या कविता आशय पोचवत असतात म्हणजे काय, या अंगाने विचार व्हायला हवा.

हं -- शास्त्र वा तंत्र यांतले प्रश्न सोडून इतर प्रश्नांना बौद्धिक उत्तरे नाहीत -- असली तर ती निरुपयोगी, खोटी आणि गुंता अधिकच वाढवणारी असणार –

हडपसर शाखेत आम्ही एकत्र काम केले होते ! माझ्या या १९७० पासूनच्या मित्राच्या स्मृतीस अभिवादन !

त्यांच्या ( गो. म. कुलकर्णी )  ' रसग्रहण ' या पुस्तकात माझा एक लेख होता.

हजारो पात्रांचे जन्मदाते ! स्मृतीस अभिवादन ! ( रंगभूषाकार प्रभाकर भावे )।

खुद्द लंडनमध्ये एकदा गेलो असताना ( दारूविरहित ) असा प्रसंग माझ्यावर आला होता. ना जवळ कुठे मुतारी ना हॉटेल ! नाइलाज झाला ! एका कडेच्या, रस्त्यापासून थोड्या अंतरावरच्या झाडाखाली मी कार्यभाग उरकला ! कुणी काही पाहिले नाही त्यामुळे गुन्हा घडलाच नाही ! मग साळसूदपणे माझ्या मार्गाने निघून गेलो !

उदाहरणादाखल ही घ्या सीमिकची एक कविता ---

पहाटे चारचे आरसे ( Mirrors at 4 A. M. )
-- चार्लस सीमिक –

तुम्ही त्यांच्याकडे बाजूच्या रस्त्यांनीच या
सावल्यांच्या गुंताड्यातल्या खोल्यांकडे,
बघा त्यांच्या रिकामेपणाचे दृश्य पण
त्यांना मात्र उलट तुम्ही
ओझरतेही दिसू नयेत असे.
त्याचे रहस्य असे आहे,

एखादी रिकामी शय्याही त्यांना ओझे वाटते,

एक खोटेपणा.

ते स्वतःशी अधिक खरे असतात

कोऱ्या भिंतीच्या सहवासात,

काळ आणि अनंतता यांच्या सहवासात

जे, क्षमा करा,

त्यांची कोणतीच प्रतिमा नाही उमटवत

त्यांना स्वतःचेच कौतुक वाटत असताना आरशात,

जेव्हा तुम्ही उभे असता एका बाजूला

हातरुमाल बाहेर काढत

तुमची भुवई पुसण्यासाठी चोरटेपणाने.

--- ००० ---

माझ्या, ' एक गगनभेदी किंचाळी ' या नाटकातले अविस्मरणीय मोरेकाका ! ( चंद्रकांत कल्लोळी )

माझ्या ' ढोलताशे ' चा पहिला हीरो ! खूप शुभेच्छा ! ( अजित भुरे )

पुस्तक तर महत्त्वाचे आहेच, त्याचप्रमाणे, तुझे ते समजून घेण्याची प्रक्रिया मांडणेही ! उत्तम !
( लाख्यांच्या ‘ नाटक : मुक्त चिंतन ‘ – या पुस्तकावरची समीर दळवी यांची पोस्ट ).

--- आणि शक्य तो निरनिराळ्या बोली बोलणारी पात्रे घे -- त्यांचे सगळे संवाद त्यांच्या त्यांच्या बोलीत लिही -- जाता जाता मराठीत एक क्रांतीही करू ! ( स्वप्नील चव्हाणच्या पोस्टवर )

ती सुन्नता घालवायला नंतर टाईडच्या तीन वड्या लागल्या !

अशा काही सात्त्विक लोकांकडून मीही, पळिपंचपात्रीवाले, जानवेवाले, भिक्षुक, ब्राह्मण. आरेसेसवाले असे शब्द ऐकून घेतलेले आहेत. त्यांच्या डोक्यांतले तेच नेमके जर मला बोलता आले नाही तर त्यांचा असा उद्रेक होतो, हे माझ्या लक्षात आले. माझा त्यांना त्रास नको या सात्त्विक हेतूने मी त्यांना ब्लॉक केले.

तेवढा आवाक्याचा ऐवज नसेल तर कशाला दीर्घकविता ? की दीर्घ कविता लिहिताच मान्यता लौकर मिळते ?

कवितेतला मी म्हणजे स्वत: कवी नव्हे.

स्वत:च्या अशा घट्ट ओळखी घेऊन जगणारे लोक ' एकदिलाने ' काहीही करू शकतील ?

भयाण वास्तवाचे उकळते शब्द ! ( स्वप्नील चव्हाणची कविता )

भाषेच्या पुरात असा बिनधास्त पोहणारा कवी मराठीत असणे ही एक गहन आणि महान गोष्ट आहे !
( श्रीधर तिळवे यांची कविता )

' माझ्या .. ' अशी विलास सारंगांची कथा आहे, हे कळले. मी ती कथा वाचलेली नव्हती. बागडांच्या या कथेत मात्र सारंगांचा उल्लेख आहे.
होय, सारंगांचा उल्लेख त्या कथेत आहे. तो माझ्या मारणारा आणि हा न मारणारा असा काही फरक दिसतो आहे.
15-02-23.

कोणताही विचारव्यूह आदर्श मानणे म्हणजे तत्त्व.

All binaries are false ! there is nothing universal ! वगैरे -- याच्या मला समजलेल्या अर्थाने मी बोलतो आहे -- त्यांची positive मान्यता कशाला आहे, ते तुम्ही सांगा.
उत्तर आधुनिकतेप्रमाणे सत्य, वैश्विकता, चांगले-वाईट यांना आहे का मान्यता ? सगळा उथळपणाच आहे -- आहे ते साजरे करू या -- असे असेल तर कसले सत्य आणि कसले ज्ञान ?
उत्तर आधुनिकता हे अभिधान जगभर वापरले जाते -- त्याला आपण भोंगळ म्हणून काय उपयोग ? -- शिवाय, मध्यमवर्गीय असे हेटाळण्याचा इथे प्रश्नच नाही -- उत्तर-आधुनिकतेत हे आहे -- सखोल काही नसते, सगळे उथळच असते -- हे उलट खोटे आदर्श बाळगणाऱ्या मध्यमवर्गीयाला पचणारे नाही --असो -- आपल्यांत आकलन-भेद आहे -- असू द्या -- शेवट गाठायची काही गरज नाही –

याच चित्रपटातले, ' साथी न कोई मंजिल ' हेही एक अमर गाणे आहे ! ( बंबई का बाबू ).

मलाही ही शंका होतीच -- नेटवर पाहिले -- खांडबहाले शब्दकोशाने हा शब्द स्वीकारलेला आहे. किंचित सुलभीकरणाकडे माझा कल असतोच. तरीही, ठीक, दुरुस्ती करत आहे. धन्यवाद ! ( अद्यावत की अद्ययावत )

काठी न घोंगडं घेऊ द्या की रं

मला बी जत्रेला येऊ द्या की ( पाच नाटककारांचा फोटो पाहून ).

( माझ्या ‘ वस्तू ‘ या नाटकावरच्या लाख्यांच्या पोस्टवर – )

हे नाटक कै. अरविंद देशपांडे महोत्सवात झाले तेव्हा सुलभा देशपांडे आणि रोहिणी हट्टंगडी आल्या होत्या. त्या दोघींनाही नाटक खूप आवडले होते.

--- आणि २४ तास झगमगीत कपडे आणि दागदागिने घालून फिरणाऱ्या बायका !

शैलीतले नावीन्य, चटपटीतपणा, चमकदारपणा हा वाचकांना चकित करतो, भुरळ पाडतो, हे ठीक आहे. पण तो भर ओसरतो आणि मग यात मूल्यात्मक असे काय आहे, हा प्रश्न समोर येतोच. माझ्या मते मर्ढेकरांबाबतही हा प्रश्न विचारला पाहिजे. सनसनाटी पवित्रा ठीक पण तो कस नाही ठरू शकत. ( नेमाड्यांबाबतच्या लाख्यांच्या पोस्टवर ).

सध्या हे -- बघू पाहू करू -- या सदरात आहे -- बघू ! ( एका प्रकाशनाला जाण्याबद्दल ).

०८-०३-२३.

मी तर सत्यकथेचा एक वारेमाप कवी होतो -- एकदोनदा तर कवितेचा आख्खा विभागच मला देण्यात आला होता ! एस एस सी झाल्या झाल्या १९६३ साली माझी ' झुंजुन गेल्या सरी ' ही कविता सत्यकथेत पहिल्यांदा आली होती.

खरे तर ही कविता, आपण सगळेच एकत्रितपणे कसे मूर्ख आहोत हे व्यक्त करते -- पण, तुम्हाला यातही भेद जाणवतात, हे विशेष आहे !

वा, छान ! यात आपण सगळेच कव्हर झालो !

तुमच्याच काय, कुठल्याही विचारसरणीचे विभ्रम इथे अप्रस्तुत आहेत हे कृपया समजून घ्यावे. तुमच्या सहिष्णुतेच्या मर्यादेत माझे लेखन कदापि बसणार नाही, हे तुम्हाला माहीत आहे. माझ्या लेखनाच्या फंदात तुम्ही पडू नये, ही नम्र विनंती. कारण, तुम्हाला आवडणारे फडतूस वैचारिक वाद घालत बसण्यात मला इंटरेस्ट नाही. यावरही तुमचे काही हुशार वेगळे मत असेल. ते बोलत न बसता मला अनफ्रेंड केलेत तरी चालेल. मी तुच्छतावादी असल्याचे तुम्ही सुचवलेत त्या सन्मानाला मी अर्थातच शून्य किंमत देतो ! आपण एकमेकांची रजा घेणे हेच उत्तम !

जे आहे ते पाहण्याची हिंमत ! ( शर्मिष्ठा भोसले यांची कविता – ‘ ती कशी – ‘.

लॉर्ड ऑफ द फ्लाईज (देवाघरची फुले?)

Rahul Bansode
Champra Deshpande

Champra Deshpande
कादंबरीचा उत्तम परिचय !

भावनिक असो की वर्णनात्मक, वास्तव म्हणजेच आशय, अशा समजुतीतून लिहिलेली कविता ही ' चांगली ' असू शकत नाही. कोणतेही वास्तव हे भाषेप्रमाणेच कवितेचे माध्यम असते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ, आशय हा कवीच्या ' स्वभावाने ' दूषित झालेला नसतो. या पद्धतीने पाहता, वरील विवेचन योग्य वाटते.
( राहुल पुंगलिया यांच्या पोस्ट वरील कॉमेंट ).

Champra Deshpande
Sandeep Godbole हे तुम्ही जे सुलभ वास्तव म्हणताय तसे ते दिसणारे इथे फारसे कुणी नाहीत -- त्यामुळे, मी वापरलेला शब्द योग्य आहे. ही पोस्ट विदारक व्हावी हीच अपेक्षा आहे -- त्यामुळे, तुमचे वाटणे योग्यच आहे. असो.

'केमोल्ड आर्ट गॅलरी'मध्ये सुरू असलेलं चित्रकार शकुंतला कुलकर्णी यांच्या चित्रांचं प्रदर्शन, Quieter Than Silence, नुकतंच बघितलं. (३० एप्रिल २०२३ पर्यन्त ते तिथे सुरू असणार आहे.)चित्रा राजेंद्र जोशी – २९.०३.२३
या चित्रांबद्दल जे जे जाणवले ते ते उत्कटपणे व्यक्त केले आहे ! छान !

तुलनात्मक आहे पण त्यात न्यूनगंड वा अहंगंड नाही, हे लक्षात घेऊन बघ.

कविता विशिष्ट असणार -- आशय विशिष्ट असणार नाही –

Champra Deshpande
Sudheer Rasal काही लोक तर्कदुष्ट अर्थ लावूनही मते देत आहेत. कवी हा विचारशून्य असतो असे कुणीच म्हणणार नाही. अर्थ चुकीचे लावायचे आणि त्यावर सोयीस्कर मत द्यायचे, असे घडते आहे.

" धर्मांध प्रतिगामी अन् जात्यंध पुरोगामी यांचा हा आधुनिक महाराष्ट्र ही तुमची पोस्ट कदापि सहन करणार नाही ! "
( संतोष सुनील यांच्या पोस्ट वर ).

जे आहे त्याचे समग्र भान हा संदेश नसतो -- त्याला वैचारिक दिशा देणे हा संदेश असतो -- या समजुतीतून मी लिहिले आहे.
१६-०४-२३.
Padmanabh Pathak तू असे म्हणतोस पण दुसरे काही मित्र म्हणतात की स्वत:ची टिमकी वाजवायला शिका जरा, नाहीतर कुणी ढुंकून दखल नाही घेणार तुमची ! यावर मी, ' कभी हां, कभी ना ' असे करत राहतो ! त्यातही, ' लहानपण दे गा देवा ' ही रणनीतीही चांगली असते, असा माझा अनुभव आहे ! या सगळ्याचे बेमालूम बॅलन्सिंग करत चालायचा माझा प्रयत्न असतो ! पण हे प्रयत्न मी फार गांभीर्याने नाही करत !

Gautam Ainapure ते जाऊ द्या सगळे -- कदाचित देवनागरी हा शब्द तुम्हाला आवडणार नाही, पण, इलाज नाही, आपल्या लिपीत लिहायला लागा की आता ! काही वर्षे झाली तुम्हाला ही विनंती करून !

अत्यंत उत्तुंग आहे हा लेख ! ग्रेट ! मराठीत याची ताबडतोब विल्हेवाट लावायचे प्रयत्न होतील. आपल्या विचारात जे बसत नाही ते फालतू -- हे इथले प्रस्थापित सत्य आहे ! टिंगल-टवाळ्या आणि शेरेबाजी हेच या लेखाचे भवितव्य असेल. " बुध्दीवाद विवेकवाद किंवा पुरोगामीपणा वगैरेंच्या बळावर एबस्ट्रॅक्शन नाकारलं जातंय. " -- हे तुमचे वाक्य हे इथले एक गलिच्छ सत्य आहे ! इथल्या कलाक्षेत्राचे मुख्य कार्य म्हणजे सर्व सांस्कृतिक प्रवाह मातीत घालत राहणे, हे आहे. सवयीचे, रद्दड, रटाळ असे ' नवे नवे ' अभिव्यक्त करत राहणे, एवढे इथे बास आहे. -- हे असे खरे तर बोलू नये, पण, लेख खूपच आवडल्याने चुकून बोलले गेले आहे. त्यामुळे, इथेच, सॉरी म्हणून मोकळा होतो ! (रवी लाखे )

फारच चांगले परीक्षण ! मराठीत चांगले नाट्यसमीक्षक वा एकूणच समीक्षक यांबाबत एक पोकळी आहे -- ती भरून काढण्याचे काम बऱ्याच प्रमाणात तू करू शकशील ! गांभीर्याने मनावर घ्यावे ! ( काठपदर वर गिरीश पतके. )

Ramesh Aundhkar कशाबद्दल ? मुळात हा संवाद पुन्हा त्याच अटीतटीने चाललेला आहे. ही पोस्ट त्या अंगाने लिहिलेली नाही. इथे आलेल्या कोमेन्टची मी दखल घेतो म्हणजे ते मला मान्य असते असे नव्हे. त्यामुळे ' तुम्ही पण ? ' असे तुम्ही का म्हणत आहात ते कळले नाही.Ramesh Aundhkar इथे अनेक कॉमेंट मला न पटणाऱ्या आहेत -- सहभागी होणाऱ्यांकडे दुर्लक्ष केले असे होऊ नये म्हणून -- दखल घेणे या अर्थी मी लाईक करत असतो. हे मी माझ्या सर्वच पोस्टवर करतो. मुकुंद कुळे यांनी तुम्हाला असे म्हणणे किंवा कुणीही कुणालाही तर ते चर्चेचे गांभीर्य घालवणारेच आहे. मला ते मान्य नाही.एक बाजू घेऊन भांडत राहिल्यास संवाद कसा निरर्थक होत जातो हे या संवादातून कळू शकते.जगातल्या प्रत्येक समस्येवरचे उत्तर समजणारे काही लोक आहेत खरे तर -- त्यांचा प्रभाव का पडत नसावा ही आणखी एक समस्या !अनेकांच्याकडे तेल न लावलेली अनेक दगडी तत्त्वज्ञाने वा प्रणाली आहेत -- ती सर्व मिळून जगणे बरबाद करत आहेत ! की एखाद्यालाच ' सत्य ' वाटणारे आणि हाती पकडता येणारे तत्त्वज्ञान सर्वांनीच आत्मसात केले पाहिजे, असे तुम्हाला वाटते ?तथाकथित धर्माचा साचा आणि

विचारसरणीचा साचा हे दोन्ही सारखेच घातक असतात -- हे सगळ्यांनाच कळावे असा विशाल आशावाद बाळगायला हवा ! माझ्या वा तुमच्या कुवतीपेक्षा जास्त कुवतीचे आपण काय कसे करू शकणार ?

त्याबाबत मी दुसरी पोस्ट दिलेली आहे.
बाजू घेण्याच्या तथाकथित वैचारिक स्पष्टतेमुळेच तर माणसाच्या जगण्याची बोंब होते आहे, असे दिसले तर तेच कसे करावे ? समस्या समजून घेण्यात आपण एकत्र असू शकतो पण कुणी कुणाला बोध देऊ शकत नाही -- ही माझी स्पष्टता आहे. ( शरद पोंक्षे ).

डाव्यांना दु:खमुक्ती, निर्वाण -- हे चालेल का याची शंका वाटते !

हा उतारा ( दोन्ही अर्थांनी ) ग्रेटच ग्रेट आहे ! प्रत्येक साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारावर हा ढळढळीतपणे लावला जायला हवा ! मराठीत डॉक्टरेट करणाऱ्या प्रत्येकाला हा उतारा पाठ करणे बंधनकारक असावे ! ( राहुल पुंगलिया )

माफ करा, हा लेख वर्णनात्मक आणि मोघम झाला आहे. त्यांच्या एखाद्या कलाकृतीच्या आशयाचा ' मोठेपणा ' म्हणजे काय होते ? एखादा वैचारिक साचा की अधिक खोलातले आकलन ? बाहेर ते काहीही बोलत-वागत असोत, जगण्यातल्या आध्यात्मिक समस्यांचेही त्यांना भान होते. ते नुसतेच ' विचारी ' नाटककार नव्हते, असे वाटते.
( दीपक बोरगावे ).

कोणत्याही काळाला संबोधित करणे यासाठी कला असते असे मला दिसत नाही. कोणत्या तरी काळाचा माल तीत असतो, इतकेच.काळाला संबोधित करतच नाही म्हटल्यावर 22 व्या शतकाचा संबंधच येत नाही. मुळात आजचा काळही प्रत्येकाचा वेगळा असतो, हे वर आलेलेच आहे. असो. मतभेद तर असणार.माफ करा, तुम्ही म्हणता तेच अशक्य आहे -- माझी पोस्ट तुम्ही नीट वाचलेली नाही. आजचा काळ असे काही नसतेच, असे मी मांडले आहे. प्रत्येक माणसाचा काळ वेगळा असतो. काळ म्हणजे घड्याळ नव्हे --मानसिक काळ. प्रत्येक माणसाचा मानसिक काळ वेगळा असतो -- एकाचा 2023 चा, एकाचा 1947 चा असे म्हणता येत नाही. ढोबळपणे मांडायचे झाल्यास, जातवादी पुरोगाम्याचा काळ वेगळा, जाती-अंतवादी पुरोगाम्याचा वेगळा, हिंदुत्ववाद्याचा वेगळा, मुसलमानाचा वा कम्युनिस्टाचा वेगळा -- असे असते. कलावंत एखाद्या भ्रामक, काल्पनिक काळाला संबोधित करत नाही. तो एकूण माणसाला संबोधित करतो. त्याचे माध्यम हे त्याचा काळ असते. त्यामुळे माझा वा तुमचा मानसिक काळ सालनिहाय सांगणे हे भ्रामक असते. ( सुनील तांबे ).

चि. श्रेया ही माझी नात आहे. तिला चित्रकलेची आवड असल्याने अशा ठिकाणी ती माझ्याबरोबर येत असते.
धन्यवाद, प्रकाशजी !

मूर्षा नव्हे, तो शब्द मृषा आहे.

Champra Deshpande

मी बऱ्याच वर्षांपूर्वी ' अभिनय ' हा लेख लिहिला होता -- त्यातला, इथे प्रस्तुत असणारा काही भाग --

अशा या पार्श्वभूमीवर आता एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. अतीव दु:खाचा असा प्रसंग सादर करायचा असेल -- त्यात रडायचे असेल -- तर स्वत:च्या व्यक्तिगत जीवनातला एखादा तत्सम अनुभव आठवून रडावे का ? यावर कुणी असेही म्हणेल की एखादा नट तंत्र कसेही का वापरेना, त्याचा अभिनय कसा होतोय तेवढेच आपण पाहावे. ते पाहू, पण यात कायकाय घडेल ते पाहायचे टाळायचेही कारण नाही. याचा अर्थ असा होतो की एखाद्या नटाची आई वारलेली असेल आणि त्यावेळी त्याला खूप रडण्याइतक्या दु:खाचा अनुभव आला असेल तर तो अनुभव, हा नट, अभिनय चांगला होण्यासाठी वारंवार वापरत राहील ! आणि हा त्याचा अभिनय समजून प्रेक्षक त्याला दाद देत राहतील ! दु:ख विस्मृतीत जावे या निसर्गक्रमाच्या विरुध्द तर हे होईलच पण शिवाय ही प्रेक्षकांची घोर फसवणूक होईल. आपण याच्या खऱ्या

दु:खाला ' वाह् ' म्हणालो हे प्रेक्षकांना कळाले तर ?

हाच प्रश्न जरा वेगळ्या प्रकारे पाहू. अमिताभ बच्चन सुपरस्टार होण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण हे आहे की त्याने अतिशय हाय-होल्टेज अभिनय केला. गरज पडेल तेव्हा भावनिक तीव्रता तो फारच प्रचंड वाढवू शकला -- जे दुसऱ्या कुठल्या नटाला जमले नाही. मग, असे सीन्स करताना तो कुठल्या आठवणी काढत असेल ? त्याच्या लहानपणी तो असा वागला असेल ? असे असते तर त्याच्या वडिलांना एवढ्या कविता लिहिता आल्या असत्या ?

दु:खाचेच उदाहरण पुढे चालवायचे झाले तर पात्रापात्रागणिक दु:खाच्या तऱ्हा वेगवेगळ्या असतात. एखाद्या वैयक्तित दु:खाच्या त्याच त्या आठवणीवर विसंबून -- असे हे अनेक बारकावे -- सूक्ष्म छटा दाखवणे शक्य होईल ?

लेखक जेव्हा असे प्रसंग लिहितो तेव्हा तो काय करतो ? पात्रांचे वेगळेपण तो स्वत:च्या वैयक्तिक अनुभवाच्या चाकोरीत फिट करून टाकतो ? तसे असेल तर मग नटाच्या अनुभवाच्या वैयक्तिक चाकोरीतून ते कसे व्यक्त होऊ शकणार ? ' असाध्य ते साध्य ' असा हा प्रकार आहे ?

याचे उत्तर अर्थातच ' नाही ' हेच असणार आहे. लेखक असो, नट असो, जगण्याच्या ओघात आलेली ' अनुभवांची समज ' वापरत असतात. प्रत्यक्ष वैयक्तिक अनुभव नव्हे ! आणि ज्याअर्थी एका सीनमधले दु:ख व्यक्त करण्यासाठी कुठलेतरी वैयक्तिक दु:ख वापरता येते याचा अर्थच सगळे दु:ख एकच असते. कोणत्याही दु:खाची समज आली असेल तर इतर कुठलेही दु:ख समजू शकते. दु:ख ही एक निरनिराळ्या कारणांनी निर्माण होणारी मन:स्थिती असते असे म्हणता येईल. अपमानाचे दु:ख आणि आई वारण्याचे दु:ख ही मूलत: वेगळी नसतात. ही ' समज ' असल्यावर वेगवेगळ्या प्रकारचे दु:खही व्यक्त होऊ शकेल. लेखकाचे आत्मचरित्रात्मक नाटक असले तरी नटाच्या बाबतीत हेच खरे असेल. एका एका प्रसंगाला एकाएका प्रसंगाची आठवण हा अभिनयाचा खोटा, अकलात्मक, विकृत प्रकार असून

’समज’ व्यक्त होणे हेच अपेक्षित आहे. खऱ्याखोट्यात सतत हेलकावत -- फाटत राहण्याची काहीही आवश्यकता नाही. असल्या तंत्रामुळे अभिनय कसदार होणार नाही. त्यातली सहजता, उत्स्फूर्तता हरवून जाईल. आणि याहूनही सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नटाच्या स्वत:च्या जगण्याला ही पध्दत हानिकारक ठरेल. ज्या गोष्टी विस्मृतीत जाव्यात असा निसर्गक्रम आहे त्या गोष्टी सतत ताज्या ठेवल्या जातील. जखमा भरून येणार नाहीत.

हे रोमँटिक की माझाच मार्ग बरोबर म्हणणारे रोमँटिक ?

ग्रेट नाट्यपरीक्षण ! हे सखोल लेखन ही एक कलाकृतीच आहे ! ( पुनश्च हरी ओम  वर गिरीश पतके ).

आपल्या मनाचे कंडिशनिंग हा सर्जकतेला अडथळा असतो -- हा त्याचा अर्थ आहे -- त्यातून येणारे सर्व प्रयासयुक्त असते -- आणि मलाही तो अर्थ मान्य आहे. तालमी घ्याव्या लागणे, नेपथ्य उभारावे लागणे -- या मेहनतीचा हा विषय नाही. ती लागणारच.कलावंत जगत येतो, वाचतो, पाहतो, अभ्यास करतो -- ही मेहनत असतेच ना ! तुमचा नेमका आक्षेप काय आहे ते सांगा ना --त्या वाक्याचे पुस्तक आणि पान क्रमांक माझ्याकडे नाही आहे -- ते लक्षात राहिलेले वाक्य आहे -- ते माझेच धरून चालायला हरकत नाही. ते चुकीचे आहे असे काहींना वाटू शकते. त्याला इलाज नाही.
व्यक्तीच्या कंडिशनिंगमधून होणारी कृती ही सहेतुक, व्यक्तीच्या विचारांनी, मतांनी दिशा दिलेली असते -- सर्जकतेत ही मर्यादा नसते -- हे जगात अनेकांनी वेगवेगळ्या शब्दांत म्हटलेले आहे. तरीही काहींचे आकलन तसे नसल्याने त्यांना ते निरर्थक, चुकलेले वाटू शकते. त्याच्यापुढे चर्चेने एकमेकांना काहीच पटवणे शक्य नसते. कंडिशनिंगची कृती ही ताणयुक्त म्हणून सप्रयास असते. अमुक चुकले आहे असे तुम्ही कितीही स्पष्टपणे म्हटले तरी आपण कुणीही अशा बाबतीत ऑथॉरिटी असू शकत नाही. मी मांडतो आहे तेच बरोबर वा सत्य असा माझा कधीही दावा नसतो. असो. जाऊ द्या -- होऊ शकते असे -- थोडी चर्चा झाली पण हाती काही लागले नाही -- मी काही क्लियर करायचा प्रयत्न केला पण कुणाला काही पटवून द्यायची जबाबदारी मी कधी घेत नाही. असो. रामराम ! ( आभास आनंद ).

मी शंकर वैद्यांचा विद्यार्थी. अनेकदा मी त्यांच्या माटुंगा इथल्या ' आफ्रिका हाउस ' मधल्या निवासस्थानी गेलो होतो. डॉ. सरोजिनी वैद्य या त्यांच्या पत्नी. त्यांनीच मला आकाशवाणीवरच्या एका विद्यार्थी कार्यक्रमात कविता वाचनासाठी नेले होते. त्यांच्या घरी एकदा मी जेवलोही होतो. त्यांच्या घरी झालेल्या अनेक गप्पा या समृद्ध करणाऱ्या होत्या. त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

मौल्यवान कथांचे समतोल परीक्षण ! ( रज्जूत मज्जा वरचे लाखव्यांचे समीक्षण ).
20-06-23.

करमणूक, बोध, आरोग्य आणि यशस्वी होण्याचे नुस्खे देणे -- अशी उद्दिष्टे सोडून लिहिली जाणारी काही सांस्कृतिक महत्त्वाची पुस्तके डोळ्यांपुढे घेऊन ही पोस्ट लिहिलेली आहे. विशेषत: सर्जक साहित्य म्हणावे अशी पुस्तके. सवयीतला माल देणाऱ्या पुस्तकांचा अभ्यास कसला करणार ? डिजिटलचा मुद्दाच महत्त्वाचा ठरत जाईल असे दिसते.

शरद माधव पोंक्षे
देशपांडे सर तूम्ही कधीही निरूपयोगी होणार नाही.
Champra Deshpande
शरद माधव पोंक्षे स्नेहासाठी धन्यवाद !

वादाचे मुद्दे आहेत आणि असणारच -- त्यासहच हा विचार चालू आहे -- मुळात ही समस्या अस्तित्वातच नाहीय आणि आहे ते उत्तम चालू आहे, असे वाटणारे संतुष्ट लोकही असू शकतील.
30-06-23.

पक्ष, विचार, जात, धर्म -- असे कुठेतरी समरूप न होणे म्हणजे अस्तित्वहीन होणे ! वर्चस्वाची इच्छा आणि पराभवाची वा नष्ट होण्याची भीती हे सर्व तीव्र होत चाललेले आहे -- त्यामुळे, उपाय नाही ! हा मानसिक प्रश्न असल्याने तो जातो अध्यात्माच्या क्षेत्रात -- आणि असले प्रश्न तर फेटाळल्याशिवाय तुम्ही ' हुशार ' ठरत नाही !

ही पोस्ट म्हणजे वास्तववादाचा वा केवळ माहिती निवेदनाचा पुरस्कार आहे असे कृपया समजू नये. कवितेत कल्पना, प्रतिमा, सूचकता असणारच. सार्त्र, आयनेस्को, पिरांदेल्लो यांची नाटके ' जे आहे ते ' अशीच आहेत -- कसलेही गोडवे नाहीत.

सर्व मुद्दे कव्हर करण्याचा प्रयत्न -- कल्पनाशक्ती नाकारलेली नाही. कोणतीही सर्जक प्रक्रिया ही वर्तमानात असते -- त्याबाहेरचे वैचारिक, आदर्श वा बोधप्रद हे ती प्रक्रिया बिघडवते. बोधप्रद हे सांगोवांगीच्या गोष्टींचे गोडवे गाणे असते. सार्त्रचे ' नो एक्झिट ' हे नाटक तसे पूर्ण काल्पनिक आहे पण त्यात आदर्श वा बोध काही नाही. मानवी जगणे जे जसे आहे तसे ते पाहण्याची सर्जक प्रक्रिया आहे. पण अशा चर्चेला शेवट वा एकमत होणे असे काही घडावे अशी अपेक्षाच नाही. मला दिसणारा एखादा मुद्दा मी चर्चेला देत असतो, इतकेच. यापुढचे चिंतन हे ज्याचेत्याचे, वाटल्यास, घडू शकेल.

आणि मी एक तर पांचट लिहितो किंवा कविता नसलेले ' कवितेसम ' लिहितो -- असे तुम्हाला वाटते तर हे वाचण्यात कृपया तुमचा गंभीर, सखोल आणि अर्थपूर्ण वेळ वाया घालवू नये, ही नम्र विनंती !

व्यंगशब्द हा व्यंगचित्राप्रमाणे एक नवा प्रकार ट्राय करतोय -- नीट पाहिलेत तर हे सर्वांच्यावर आहे -- जगात फक्त दोनच बाजू असतात असे समजणे योग्य नाही –

मी पोकळ आहे एवढेच नव्हे तर नगण्य आहे -- हे मान्य !

व्यंगचित्रासारखेच हे व्यंगशब्द बघा ना ! जगात दोनच बाजू असतात या कल्पनेतून बाहेर पडा -- आपल्या जगण्यातली absurdity पाहणे, हाही एक प्रकार असतो -- तुम्हाला नसेल चालत तर वाचू नये, ही विनंती –

मला म्हणायचे ते पोस्टमध्ये म्हटलेले आहे -- याला कुणी बगल म्हणत असेल तर नाइलाज आहे –

कला असो की व्यक्तिगत जगणे, मात करण्याच्या मानसिक आक्रमकपणात मनाची शक्ती विभागली जाते -- क्षीण होते -- हे पाहावे. समूहकलाही याला अपवाद नाही.
24-07-23.

एक बाजू घेणे हा दुसऱ्या बाजूला नुइसन्स असतो आणि absurdity पाहणे हा सर्वांनाच ! म्हणून सगळ्यांनी सगळेच बंद करावे ? मग तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गरजच संपेल !

आंतर्विरोध, स्वत:त फूट पाडणे, बाहेर फूट पाडणे -- ही सर्व मानवी मनाची अटळ कामे आहेत !

एखादा नट वा नटी खरोखरचे तळमळू-रडू लागली तर टीममधले इतर लोक मदतीला धावतील, असे वाटते -- शिवाय त्या दृश्याची त्या कलाकृतीत अपेक्षित असलेली लय व तीव्रता बिघडून जाईल. कला ही अशी ' वास्तव ' असून चालणार नाही. ते ठीक. पण मला एक फारच साधी शंका आहे -- त्या माश्यांना कसे कळले असेल की फक्त अमूकच माणसाला चावायचे आहे ? चुकून त्या भलत्यांनाच चावल्या असत्या तर ? एखादा नट आहे समजा धाडसी पण बाकीचे लोक कसे तयार होतील ? असे सगळ्यांना धोके पत्करायला लावणे योग्य नाही वाटत.

त्या यादीत, विचारसरणी, पक्ष हेही घ्यायला हवेत. पण, तुम्ही म्हणताय ते नुसते एक स्वप्नरंजन आहे कारण कुठे ना कुठे माणूस समरूप झालेलाच असतो. जे. कृष्णमूर्ती विचारतात तोच आहे खरे तर हा प्रश्न -- कंडिशनिंग शिवाय माणसाला जगता येईल का -- हा तो प्रश्न. पण, आपण बुद्धिप्रामाण्यवादाशी कर्मठपणे समरूप झालेले असल्याने, हे असले प्रश्न क्षणात उडवून लावणे, हेच घडेल. हा प्रश्न विचारणाऱ्याला वेडा ठरवले जाईल !

गिरीश साळवी हा माझा एक उत्तम दोस्त आणि मोठा नट होता. तेंडुलकरांच्या कथेवर आधारित, ' चौऱ्याहत्तर पावसाळ्यांचा जमाखर्च ' हा गिरीशचा एकपात्री दीर्घांक ज्यांनी त्या वेळी बघितला त्यांनी मराठी रंगभूमीवरचा एक अपवादात्मक चांगला प्रयोग बघितला, असे मी म्हणेन. संवादफेक आणि टाइमिंग यांत तो मास्टर होता. तो दीर्घांक गिरीश पतके या माझ्या बुद्धिमान दिग्दर्शक मित्राने बसवलेला होता. आम्ही अनेकदा एकत्र येत असू. रात्री उशिरा मला पुण्याच्या एशियाड मध्ये बसवून मगच घरी जायचे हे त्याचे व्रत होते ! आपला लेखक म्हणजे जीव की प्राण असे मानणारा एक वेडा माणूस ! माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' मध्ये त्याने ठाकूर ही इरसाल भूमिका केली होती. माझ्या, गिरीश पतकेनेच बसवलेल्या ' डावेदार ' या नाटकातला कनफ्यूज्ड कम्युनिस्ट त्याने अप्रतिम रंगवला होता. दोन्ही गिरीश एकमेकांना भटा आणि जाड्या यांसह अनेक अर्वाच्य शिव्या देत. मजा येई ! तो मूर्ख माणूस, आम्ही अनेकदा ' काळजी घे ' असे सांगत असूनही लौकर गेला !

चेतनने माझे ' इराक ' हे नाटक दिग्दर्शित केले होते ! स्मृतीस अभिवादन !

तुकारामाच्या अभंगाचा अर्थ तद्दन चुकीचा सांगितलेला आहे. असाच चुकीचा अर्थ आ. ह. साळुंकेही सांगतात, असे मी वाचले होते. तुकाराम बाहेर एक सांगायचे आणि आत वेगळेच समजून राहायचे, अशी फसवाफसवी करतील ?
पूर्वी मी एका ठिकाणी लिहिलेला मजकूर --
देव असण्या-नसण्याच्या संदर्भात तुकारामांच्या दोन ओळी पाहण्यासारख्या आहेत :--
आहे ऐसा देव वदवावी वाणी !
नाही ऐसा मनी अनुभव !!
एक अभ्यासक, या ओळी, तुकाराम मुळात कसे नास्तिक होते हें सिध्द करण्यासाठी वापरतात, असं मी वाचलं होतं. म्हणजे देव आहे असं वरवर म्हणावं पण तो नाही हे मनातल्या अनुभवरूपात समजून घ्यावं ! ढोंगीपणावर आसूड ओढणारे तुकाराम स्वत: ढोंगी होते ? तसं नव्हतं. या ओळींचा अर्थ नीट समजून घ्यायला हवा. तुकारामांच्या मते ' देव आहे ' हे एक होकारात्मक वाक्य दिसत असलं तरी देवाचा प्रत्यक्ष अनुभव हा 'नाही ऐसा ' म्हणजे 'काहीच नसण्याचा ' आहे. ' मागेपुढे अवघे रिते । कळो येते अनुभवे ।। ' असं ते म्हणतात. त्यांच्या अभंगांवरून असं दिसतं की देवाचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे चैतन्यमय अशा काहीच नसण्याचा अनुभव. यात मनाची विदीर्णता लोप पावते. इथे एकविधता-एकात्मता असते. विदीर्णता ही दु:खमय असते आणि एकात्मताच फक्त आनंदमय असते -- हा सारांश. याचा अर्थ देव नाही असं म्हणणारे लोक या एकात्मतेची शक्यताच नाकारतात. 'अशी एकात्मता शक्य आहे का ? ' हा योग्य प्रश्न म्हणता येईल. शक्य आहे किंवा शक्य नाही ही मतं निरर्थक आहेत.

नेमाडे आणि साळुंखे यांनी लावलेला अर्थ घेतला तर आख्खी गाथा मातीत जाईल !

हे जरा सविस्तर ---

तुकारामाच्या एका विवाद्य अभंगाबद्दल बोलू या. त्यातल्या पहिल्या दोन ओळी अशा आहेत --
आहे ऐसा देव वदवावी वाणी ।
नाही ऐसा मनी अनुभवावा ।।
-- या ओळींचा आधार घेऊन नेमाडे, तुकारामाने निरीश्वरवादही व्यक्त केला होता, असे म्हणतात. आणखी एक विद्वान डॉ. आ. ह. साळुंखे तर तुकाराम नास्तिकच होता हे सांगण्यासाठी या ओळी वापरत असल्याचे वाचले होते. या दोन ओळींमुळेच अनेकांचा घोटाळा होतो, असे दिसते. याबद्दल मला काय वाटते, ते सांगतो. ‘ असणे ‘ ही होकारात्मक अभिव्यक्ती आहे आणि ‘ नसणे ‘ ही नकारात्मक. देव आहे असे जरी आपण होकारात्मक म्हणत असलो तरी त्याचे प्रत्यक्ष अस्तित्व नकारात्मक आहे. ‘ रिकामीक ‘ आहे. ‘ तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ‘, ‘ मजहून नष्ट आहे ऐसा कोण ‘, ‘ अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ‘, ‘ मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ‘, ‘ तुका म्हणे पोते । देवे भरिले नव्हे रिते ‘, ‘ देह निवेदुनि पायीं । जालों रिकामा उतराई ।। ‘ – असे बरेच सापडेल. जे कृष्णमूर्ती, ओशो वा आणखीही काही संत या रिकामेपणाबद्दल ( emptiness ) बोलतात. सारांश, हा निरीश्वरवाद नसून ‘ देव ‘ या शुद्ध अनुभूतीचे हे वर्णन आहे.
या बाबतीत फोन करून मी डॉ. सदानंद मोरे यांच्याशीही चर्चा केली होती, हे इथे नमूद करून ठेवतो. नेमाड्यांच्या पूर्ण भाषणावर बोलावे असा माझा अभ्यास नाही. त्या भाषणातला हा मुद्दा महत्त्वाचा वाटला म्हणून लिहिले आहे.

कवीची आकलन प्रक्रिया ' पोचणे ' असे काही घडणारच नसेल तर कविता लिहिली का जावी ? अर्थ म्हणजे आपण ' लावलेले ' वा 'वैचारिक अर्थ ' असे तर समजत नाही ? इथे, कविता विचाराच्या क्षेत्रापुरती मर्यादित असते का, असाही प्रश्न येईल. ' वैचारिक ' कवितेत तर वाचकाला कसले स्वातंत्र्य असेल ?

माझा तुम्ही गौरव करू इच्छिता निरागसपणे यासाठी तुम्हाला दहा सलाम ! पण, तुमच्याइतके मला काहीच समजत नाही, हे मी जाहीर कबूल करतो ! ' हित ' नावाची माझी कालची पोस्ट वाचा -- माझे अज्ञान ती अधिक ठळकपणे व्यक्त करणारी आहे ! तुम्हाला खूप आवडेल ! मी तुम्हाला जे उत्तर देतो ते नंतर तुम्ही वाचतही नाही याचा मात्र खेद वाटतो !

तर तुम्ही म्हणताय तेच करत राहणे भाग आहे का वर्षानुवर्षे -- यावर आहे ही पोस्ट. बरोबर म्हणजे काय ते ठरलेलेच असून त्याप्रमाणे चालले की झाले -- हा भ्रम आहे. वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळे बरोबर वाटते ! -- या पूर्ण समस्येवर ही पोस्ट आहे.

पुस्तकाची विक्री, सवलत, किंमत यांबाबतची पोस्ट कालच, म्हणजे दिनांक १७-०८-२३ ला, दिली आहे, ती कृपया पाहावी.

' मॅक्बेथ ' आणि ' कँटरबरी टेल्स ' हे मी एक ग्रेट पारशी प्रोफेसर होमाई जे. श्रॉफ यांच्याकडून शिकलो. त्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एम ए होत्या !

तुका म्हणे हरिच्या दासा । शुभ काळ सर्व दिशा ।।

ओढ के अंधेरा मै जो पियासे मिलन गायी
चांदनी सिमटके बदन मेरा बन गई
--- अलका याज्ञिक -- चित्रपट -- सर –

( बुद्धीनेच बुद्धी निरर्थक असल्याचे दिसणे ! )

सर, मला जे दिसते ते असे -- मराठी भाषा, ती बोलणाऱ्यांच्या संख्येमुळे जगात 5 वी की 12 वी राहील, पण, साहित्यकला म्हणून ती नष्ट होत चाललेली आहे. लौकरच दार्शनिक तत्त्व असणारे साहित्य इथे कालबाह्य ठरणार आहे. याची खेदखंत कुठे फारशी दिसत नसल्याने ही प्रक्रिया वेगाने होईल असे वाटते. त्यामुळे, ज्याला जे समजते, महत्त्वाचे वाटते, ते त्याने करावे आणि आपण वाळवंटात मुतलो, असे समजून विसरून जावे, असा ' विकासकाल ' चालू आहे ! या परिस्थितीला प्रतिकार न करता आपले काम करत राहणे -- असे माझे चालूआहे. ( म्हणजे, तुम्ही काय स्वत:ला तारणहार समजता की काय, असे म्हणत काहीजण यावर उसळून येतील, हे मला माहीत आहे. )
सगळेच नष्ट होणार आहे, हेच खरे समाधान !
३१-०८-२३.

त्याच्या अस्मितेला सुरक्षितता हवी तर मग माझ्या का नको -- हा असतो मुद्दा. मूळ धर्म काय म्हणतो वगैरे बकवास करून उपयोग नसतो. धर्मवाद हा फूट पाडतो असे म्हणत राहणे हाही एक फूटपाड्या धर्मच बनतो ! त्याचीही एक अस्मिता बनते ! एकात्मतेने जगणे म्हणजे काय, असे जगणे शक्य असते का -- असे प्रश्नही कुणाला पडत नाहीत ! मग, तो कसा मूर्ख आणि मी कसा शहाणा, एवढेच उरते ! ते आपण सर्वचजण करत आहोत !

तुम्ही देवनागरी शिका हो ! आईन्यात तुमचा तुम्हाला मराठी माणूस दिसू द्या ना !

ही सवय मला कधी लागली ते आठवत नाही पण पूर्णविराम आणि सातत्य हे दोन्ही जाणवावे, असा हेतू असावा -- हे जाणीवपूर्वक तयार केलेले व्याकरण नाही. ( इथे पूर्णविराम दिला आहे ! )
नाटकांचे संवाद लिहितानाच हे घडते. इतर गद्य लेखनात नाही. ( पूर्णविरामा ऐवजी डॅश ).

What is normal ? Hate, possessiveness, conflict, wars, destruction -- we consider all this as normal ! Man has always sought freedom from this so called ' normal ' because it is trouble, pain and sorrow.

माझ्यात माझे एक गुरू आहेत -- त्यांनी मला ' जाने दो ' हा हिंदी मंत्र दिला आहे -- याने भलीभली म्हणजे बुरीबुरी संकटे पार पडतात ! वापरून बघ !
जाने दो म्हणजे स्वत:सह सगळे जाने दो !

गणपतीच्या दिवसांत एकदा तरी हे नाटक वाचतोच. खूप आधार मिळतो.
"काकू, तू मला सांग की काय काय म्हणून साजरं करावं... सगळे इतके सण - घरातल्यांचे, नातेवाइकांचे, मित्रमैत्रिणींचे वाढदिवस, उदघाटनं, निरनिराळे वर्षारंभ, ऑफिसचे, दुकानांचे वाढदिवस, नोकरी लागणं, प्रमोशन, मुलांच्या परीक्षांचे रिझल्ट, शिवाय खेळात पहिला, वक्तृत्वात पहिली, शिवाय सत्यनारायण, निरनिराळ्या शांती, रुद्र, मुंजी, साखरपुडे, लग्न, एकसष्ठ्या - असं किती सांगू तुला - हे सगळं रोगट नाही वाटत तुला ? आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत ?"
"...आणि धर्मात गर्दीचं काय काम ? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकाने स्वतः केलेलं आहे, तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही हे मला स्वच्छपणे पटतं."
('ढोल ताशे' या नाटकातील अक्षय या पात्राच्या संवादांतून) – विकास पालवे.
तुम्ही प्रेमाने लिहिलेली पोस्ट शेअर करतोय ! धन्यवाद !

माझा नाट्यतंत्र शिकण्याचा थोडक्यात वैयक्तिक प्रवास ..
वैयक्तिक या कारणाने की , तो प्रत्येकाचा तसा नसणार आहे .  माझे हे शिकणे नाट्यकर्मींना  सुरुवातीला ढोबळ व पारंपरिक नाट्य पद्धतीचे वाटेल पण हे सहानुभूती ने वाचावे .
मी fybsc मध्ये  होस्टेल मध्ये असताना पहिली एकांकिका खुर्ची लिहिली , जिचा विषय कॉलेज इलेक्शनच्या UR पदासाठी , एकाच हॉस्टेल रूम मध्ये राहणारे 2 मित्र उभे राहतात . एक जरा विचारी आहे , दूसरा आडमुठा . तर यानिमित्ताने खुर्ची या संकल्पने बद्दलचे त्या विचारी मुलाचे [म्हणजे माझे  ]एक सीमित बालिश आकलन मांडले जाते , त्या दोघांच्या चर्चेतून . म्हणजे हे चं प्र देशपांडे यांच्या नाट्यपद्धतीचे झाले . की दोन जणांची एखाद्या निमित्ताने होणारी चर्चा . आता तंत्राचा भाग .  यात तीन चार गावठी तंत्र वापरली गेली . कारण माझे  नाटकांचे वाचन नव्हते . फक्त सिनेमे व नटसम्राट \ वाहतो ही दुर्वांची जुडी .. असे एखाद दुसरे  नाटक . मात्र या एकांकिकेत एक तंत्र मात्र चांगले वापरले गेले . तर ही  तंत्रे पुढीलप्रमाणे :

1 } हा दोघांचा विवाद चालू असताना बाहेर पाऊस सुरू झाला आहे . नंतर तो वाढतो . आणि अखेरीला निवतो . आणि शेवटचे वाक्य होते .. " पाऊस थांबलाय जणू " . तर वातावरण \ निसर्ग आणि चाललेले नाटक यांचा संबंध जोडू पाहण्याचा माझा हा प्रयत्न . आणि तो माझा ओरिजिनल होता . सुचलेला होता . कॉपी नव्हता .

2 } यात एक खलनायक होता , कॉलेजचा दादा . त्याची एंट्री करण्यापूर्वी , मी शोले मधील अमजद खानची एंट्री होण्या पूर्वीची .. त्याच्या विषयी बोलून उत्सुकता निर्माण केली जाते , ते तंत्र वापरले . की आधी खूप त्या दादा बद्दल बरेच गोसिपिंग type बोलले जाते .. आणि मग त्याची एंट्री होते .

3 } विनोद निर्मिती साठी गोडबोले नावाचे घाबरट मुलाचे पात्र .

4 ] धक्का तंत्र . " निवडणूक हा इज्जतीचा प्रश्न असल्याने वाद आणि दमदाटी झाल्या नंतर , अखेरीस तो मुलगा एक धक्का देतो की , " मी केव्हाच इलेक्शन मधून नाव मागे घेतलेय "

नटसम्राट हे एकमेव नाटक वाचले असल्याने या एकांकिकेत संवाद पण उपमा अलंकार यांनी भरलेले होते . शिवाय सिनेमात डायलॉग मध्ये वापरतात , तश्या प्राण्यांच्या उपमा सुद्धा होत्या , वाघ , उंदीर वगैरे .

.. नंतर चांगली नाटके वाचल्यावर हे असे लिहिणे हस्यास्पद वाटू लागले . फक्त पहिला मुद्दा मला आवडला . की निसर्ग आणि मन यांचा संबंध जोडण्यातला . कारण त्यानंतर दोन वर्षानी मी ' रुद्रवर्षा ' , हे एलकुंचवार यांचे नाटकं

वाचले , ज्यात पूर्णतः हाच ' प्रयोग ' केला होता . प्रयोगशीलता हा माझा स्वभाव आहे . त्यानुसार मी experiment करत बसलो ... वेगवेगळ्या नाटकांच्या प्रभावाखाली लिहिले , खुशाल चोऱ्या केल्या , व्यावसायिक पण लिहिले . चोऱ्या म्हणजे थीम्स चोरल्या नाहीत .त्या मला खूप सुचत . अजूनही सुचतात . तर नाटकाचे आशय , फॉर्म्स , तंत्र , काही शब्द यांच्या चोऱ्या . चोऱ्या म्हणण्या पेक्षा adaption.

सुरुवातीच्या माझ्या चार पाच एकांकिका , माझ्या कॉलेज मित्राना आवडत , कौतुक वाटे , गॅदरिंगला त्यांनी प्रयोग ही केले . पण मी चांगले लिहायला लागल्यावर , एकजण मला म्हणाला , " अजिबात आवडले नाही . तुझ्या आधीच्या एकांकिका ग्रेट होत्या . "

माझा तंत्र मध्ये प्राविण्य मिळवण्याचा पुढचा प्रयत्न म्हणजे , एकच एकांकिका मी वेगवेगळ्या फॉर्म मध्ये लिहुन बघत असे . माझी दुसरीच एकांकिका , भातुकली .. जी मी .. दिशाहीन आणि चिमण्यांची शाळा अश्या तीन नावांनी पुनरलेखित केली . नंतर त्यावर सह्याद्री वाहिनी साठी सहा भागांची सिरियल पण लिहुन दिली , सादर झाली . बेट ही माझी सगळ्याना प्रिय एकांकिका , नंतर ती मी non realistic पद्धतीने लिहिली . पण आधी ती मी सरळसरळ लिहिली होती .

तिचे प्रयोग झाले , नाट्यवेध सारख्या पुण्यातील संस्थेत वाचन झाले .सागर अध्यापकने दिग्दर्शन केले . पण ती सर्वाना आवडण्यामागचे कारण , त्याचा चविष्ट विषय ...नवरा बायकोतील अपयशी सबंध . आणि लयबद्ध संवाद तंत्रा मुळे ती सगळ्यानाच वाचायला आवडायचे . लोक वाचत जायचे . याचे एकमेव कारण म्हणजे मी प्राप्त करून घेतलेले तंत्रावरील प्रभुत्व . ज्यामुळे फार काही आशय नसतानाही ,treatment मुळे ते बरे वाटायचे .

मी एलकुंचवारना एकदा म्हटले , तुमचे नाट्यतंत्र हे नाटक dramatic करण्यासाठी उद्भवते . त्यांना आनंद झाला . इथे dramaticहा शब्द वापरताना , मला तो ड्रामा अपेक्षित नव्हता , जो सुमार नाटककार वापरत असत . कानेटकर पद्धतीचे . तर पुढील नाटके .. नाट्य तंत्राने धारधार झालेली पुढील काही dramatic नाटके उदहरणा दाखल अपेक्षित आहेत .पगला घोडा , यातना घर , वासंसि जीर्णाणी . याखेरीज अतुल पेठेच्या सगळ्या एकांकिका , आळेकर यांच्या सगळ्या एकांकिका नाटके .. असे म्हणायचे आहे . आता योगेश सोमण किंवा दिलीप परदेशी वगैरे लोक पण नाट्यतंत्रात प्रवीण होते . योगेश खूप dramatic लिहितो . पण फरक हा की ते मनाच्या पातळीवर तेवढेशे जात नाहीत . प्रत्येक नाटककार कमी अधिक मन यावरच लिहित असतो . एलकुंचवार यांनी म्हटलय , की , " ... त्याचा शोध घेण्यासाठीच प्रायोगिकता राबवावी " .... पण काही मोजके नाटककार आहेत जे मन समजून आहेत . यात खानोलकर , तेंडूलकर , आळेकर , बादल सरकार , चं प्र देशपांडे , एलकुंचवार आहेत . ही परिपक्वता माझ्याकडे नाही .दळवींची सगळी नाटके मी वाचली पहिली . सगळी चांगली नाहीत पण , महासागर विशेषतः . तर असे नाटक लिहायला एक जीवनदृष्टी लागते . मी त्याला माझ्या भाषेत ' जीवनाला स्पर्श करणारे लोक ' म्हणतो . गरजेचे नाही की जीवनाला स्पर्श करणारे लोक , लेखकच असतात , ते रसिक देखील असतात . आमचा नितीन कोतापल्ले , किंवा माझे वडील होते .. ते असेच परिपक्व लोक होते . [ मी नाहीये .] .आता एलकुंचवारना माझ्या विषयी इतका राग आहे , किंवा आमच्यात शत्रुत्व आहे . पण मी त्यांचे ते फार गिफ्टेड असणे , कसे नाकारू ? या दोन वेगवेगळ्या गोष्टी मी मिक्स करत नाही. पण दुसरीकडे ते केवढे रोगट पण लिहिले त्यांनी कधीकधी . काय ते ' गारबो ' . ... खानोलकर हे एलकुंचवार यांचे आवडते नाटककार होते . पण ते दोन तीनदा म्हणाले की , " त्यांनी तंत्र शिकून घ्यायला हव होत . "

व्यावसायिक नाट्य आणि उत्स्फूर्त सुचणारे , अनुभवनिष्ठ लिहिणे यातील मला आढळून आलेला , प्रक्रीये च्या पातळीवरील फरक .

मी व्यावसायिक लिहिले , Tvसिरीयल आणि अनेक नभोनाट्य . यात मला प्रक्रीयेच्या पातळीवरील फरक कळला . व्यवसायिक लिहिताना , [ कधीकधी ] drafts बनवावे लागत . सुधारणा कराव्या लागत .

उलट मी माझी नेणीव वापरुन जे लिही ते एकटाकी असे , ते मी एकदाच लिहू शकत असे . तेथे पुनर्लेखन शक्य नव्हते . आणि व्यावसायिक लिहिताना , कधीकधी पुनर्लेखनाला पर्याय नव्हता . याचे कारण त्यात बाहेरून आत शिरावे लागत होते . पण पहिल्या टाइप चे लिहिताना आतून बाहेर यावे लागत होते .

संवाद तंत्र : विशिष्ट संवाद शैली नसावी हे म्हणणे झाले , पण काही आवडत्या संवाद लेखकाना फॉलो करणे , व पकड घेणारे संवाद लिहिण्याचे तंत्र .. जराही शब्द बंबाळ होऊ न देणे , पॉजेस चा हुकूमी वापर .. आणि याचा सराव करणे .. हाही एक तंत्र आत्मसात करण्याचा भाग . खास शैली असणे चुकच आहे . उत्तम संवाद लिहिणारे अनेक लेखक आहेत पण ते चांगले लेखक नाहीत . कारण पुण्यातील गिरीश जोशी पण चांगले संवाद लिही . ज्यात एक सहजता असते . .. अनुभवाची धार पोहचवणारे संवाद पण लिहिले जातात .

तंत्राचा अजून एक भाग : मधमाशी सारखे गोळा करत फिरणे . इतरांचे अनुभव , शब्दप्रयोग . म्हणी वाक्प्रचार वगैरे गाठीशी बाळगून ठेवणे . आता खरे सांगायचे तर ही सगळी एलकुंचवार यांची पद्धत झाली . पण ती इतरांची

असेलच असे नाही . मी काही ती फॉलो केली नव्हती तर , ती मुळातच होती . जी ए कुलकर्णींना ते बऱ्यापैकी वापरतात नाटकात . जागते रहो या हिन्दी सिनेमातील एक गाणे पण त्यांनी ' यातनाघर ' मध्ये कसे वापरलेय ते बघा . गाणे आहे : जिंदगी ख्वाब है , ख्वाब मे झुठ क्या , और भला सच है क्या ? सब सच है .

आता यातनाघर मधील हा संवाद पहा . .. : " अखेर खरे काय मग . आणि खोटे काय . " .. " खोटे काहीच नाही , सगळेच खरे आहे . आपल्याला पडलेली सगळी स्वप्ने खरी स्वप्ने आहेत ." .. नाट्य अनुभव समृद्ध करण्यासाठी मला ही मुशाफिरी किंवा स्वतःला ' संदर्भसमृद्ध ' करणे महत्वाचे वाटत असे . पण ही पद्धत प्रत्येकाची असेलच असे नाही . सगळेच जाणीवपूर्वक असे कलेक्शन करत नसावेत . पण हाही एक तंत्राचा भाग आहे . तंत्रा मुळे नाट्यकृतीला एक घाट मिळतो . एक सौन्दर्य प्राप्त होते रिचनेसस येतो . जसे वासनाकांड नाटक तुमचा कब्जा घेते . संवादातून आणि अनुभवाची ताकद दाखवत . आता अनुभवाची ताकद दाखवणारे नाटक \ सिनेमा म्हणजे ग्रेट असे काही म्हणायचे नाही . ग्रेट काहीच नाही , असे माझे वैयक्तिक मत आहे . हो , कलेचा विहगंम अनुभव देणारे असे काही असू शकते . तर एखादी एकांकिका \ टेलिफिल्म \ डॉक्युमेंटरी .. तिचा जीव छोटा पण असू शकतो . नाट्यकृतीचा छोटा जीव असण्यात वाईट काय आहे ? ज्या उद्देशाने लिहिताय त्या उद्देशाशी प्रामाणिक असले म्हणजे झाले .

नट किंवा लेखक म्हणून आपले तंत्र \ तयारी लिहलीच पाहिजे असे नाही . तो performance आहे . चांगले नाटककार हे , त्यांना कळलेले आयुष्य , कळलेली माणसे , त्या माणसांची विचार करण्याची पद्धत .. प्रोजेक्ट करतात . त्यासाठी तंत्राच्या कुबड्या हव्यातच .. असे म्हणणे नाही .

अजून एक मुद्दा . कॅरॅक्टर निर्माण करणे वगैरे पण आता जुने झाले , असे म्हटले जाऊ शकते . किंवा जबरदस्त असे मानवी अनुभव जगापुढे सादर करणे . ' वेटिंग फॉर गोदो ' चे उदाहरण बघा . यावर माझे जुने मत आहे , आणि हे मत नुसते काल्पनिक मत नाही तर ते विविध फॉर्म मधल्या एकांकिका लिहिण्याच्या अनुभवातून आलेले आहे . पण आधी हे स्पष्ट करतो की , ह्या वेगळ्या नाटकांना , non realistic असे म्हणतात . [स्वप्ना च्या पातळी वरची नाटके सिनेमे ] म्हणजे आम्हाला माधव वझे यांनी जे जागतिक इझम्स शिकवले . त्यानुसार .. non realistic.मला वाटते म्हणून नव्हे . तर मुद्दा हा की , माझी अशी समजूत आहे की , सरळ सरळ realistic लिहायलाच खरा दम लागतो . म्हणजे ज्याच्यात बौद्धिक दम आहे तोच realistic लिहू शकतो .

प्लॉट निर्माण करणे , विविध मानवी स्वभाव दर्शवणारी पात्रे निर्माण करणे . [काळी पांढरी नव्हेत . ] तर non realistic मध्ये नेणीवेचा वापर जास्त करून होतो . प्रतिभेचा .

निसर्ग देशमुख .

Champra Deshpande

छान, प्रांजळ लेखन. सगळेच सगळ्यांना पटेल असे होत नाही, पण, एका लेखकाचा नाटक समजून घेण्याचा प्रवास.

आपले काम एखाद्या व्यक्तीने अशा आत्मीयतेने आणि गांभीर्याने करणे हे खूपच आनंदाचे आहे ! धन्यवाद !

Swapnil Chavhan

माझ्या करिअर मधले एक अविस्मरणीय नाटक! वस्तू!!

Champra Deshpande

Swapnil Chavhan जबरदस्त व्हायचा तुमचा प्रयोग ! भले भले अवाक व्हायचे !

घड्याळाचा काळ आणि मनाचा काळ यांतला भेद पाहातच काळाबद्दल बोलावे लागेल, असे वाटते. मनाच्या अनुभव साठ्यामुळे असणारा मनाचा काळ प्रत्येकाचा वेगळा असणार. कलेचे वस्तूरूप पार्थिवत्व आणि कालातीतत्व हे नीट स्पष्ट व्हायला हवे. ( राहुल पुंगलियांची पोस्ट ).

महत्त्वाचा संग्राह्य लेख ! – स्वप्नील चव्हाणचा लेख – मीम प्रवृत्ती.

' सोल माउंटन ' -- मधू साबणे.

नंतर या नाटकाचे पुनर्लेखन केलेले आहे -- ' चार नाटके ' या पुस्तकात ते घेतलेले आहे -- आता ते नाटक आटोपशीर आणि राजकीय/आर्थिक भागावर अधिक केंद्रित केलेले आहे. ही सुधारित आवृत्तीही संकेतस्थळावर आहे. --- इराक नाटकाबाबत.

एक पुरवणी -- एक सांगायचे राहिले. ' हॉटेल आणि मरण यांतली सीमा ' नामक एक एकांकिका लिहिली होती. एका गावात एक वेडसर माणूस असतो. तो बोलेल ते खरे होते, अशी त्याची प्रसिद्धी असते. तिथला एक हॉटेलवाला रोज त्याला फुकट खाऊपिऊ घालत असतो. एकदा तो असा त्या हॉटेलात खात बसलेला असताना तिथे, समजा, हंबीरराव येतात. हा वेडा बोलून जातो की हे या हॉटेलबाहेर पडले की मरणार आहेत ! हंबीरराव घाबरतात. ते, हॉटेल बंद करायची वेळ झाली तरी बाहेर पडणार नाही म्हणतात. आजूबाजूच्या गावांचे लोक हंबीररावांना पाहायला जमू लागतात, वगैरे ! तीही एकांकिका नीट जमली नाही म्हणून रद्द केली ! होती गंमत पण नाही जमली -- छोड दिया !

सुरेशचंद्र पाध्ये यांनी माझ्या अनेक नाटकांवर विचक्षण समीक्षा लिहिली होती. त्याबद्दल अर्थातच मी ऋणी आहे. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो !
२४/३१ -१०-२३.

॥ अकवितेचे समर्थन करणारी समीक्षा ॥

चं. प्र. देशपांडे हे मराठीतील मोठे प्रयोगशील नाटककार आहेत, कवी आहेत आणि समीक्षकही आहेत. 'आवर्तने / कविता, आशय, आकलन' हा चं. प्र. देशपांडे यांचा समीक्षाग्रंथ वर्णमुद्रा प्रकाशनाने दहा महिन्यापूर्वी जानेवारी २०२३

मध्ये प्रकाशित केलेला आहे. देशपांडे यांनी आयुष्यभर कवितेविषयी जे चिंतन केलेलं आहे ते १०० पानी प्रस्तावनेच्या रूपात सुरुवातीला दिलेलं आहे. नंतर १३० पानांमध्ये मराठीतल्या मर्ढेकरांपासून पुढच्या काही कविता घेऊन देशपांडे यांनी त्यांचे कवितेविषयीचे चिंतन त्या कवितांना लावून दाखवलेलं आहे. म्हणजे १०० पाने सिद्धांत आणि १३० पाने त्या सिद्धांताचे उपयोजन, असे हे २३० पानांच्या पुस्तकाचे स्वरूप आहे.

देशपांडे यांना कवितेचे सगळेच पारंपारिक निकष अमान्य आहेत. सुखदुःखाची, भावनेची, विचाराची, विद्रोहाची, उपयोजन असलेली कविता त्यांना ठोकळेबाज वाटते. हे काहीच नसलेली अकविता हीच खरी कविता आहे असे त्यांना वाटते. अशा कवितेच्या चर्चेसाठी दुर्दैवाने त्यांना स्वतःच्याच कविता घ्याव्या लागतात. कारण त्यांच्याशिवाय मराठीत कुणी अकविता लिहिली नाही. त्यामुळे असे म्हणावे लागते की स्वतःच्या कवितेचे समर्थन करणारी ही समीक्षा आहे. स्वसमर्थन वाईट नसतेच. कारण साहित्यातील नवसंवेदनांच्या प्रस्थापनेसाठी मर्ढेकरांनाही हातात लेखणी घ्यावी लागली होती. गंगाधर गाडगीळ यांनी तर नवकथेचे समर्थन करण्यासाठी आघाडीच उघडली होती. आनंद यादवांनीही साहित्यातील बोलीच्या समर्थनार्थ समीक्षा लिहिली होती.

देशपांडे यांचे स्वसमर्थन यासाठी अडचणीत येते की त्यांना स्वसमर्थन मान्य नाही. शिवाय त्यांनी कुठल्याही तात्विक मुद्याच्या आधारे हे विवेचन केलेले नाही. ही केवळ माझी मते आहेत, असा खुलासा त्यांनी सुरुवातीलाच केलेला आहे. 'सैद्धांतिक समीक्षा मला योग्य वाटत नाही. ती हुकूमशाहीने वागते. मला आस्वादक समीक्षाच योग्य वाटते' असेही देशपांडे यांचे मत आहे. एकदोन ठिकाणी अकविता लिहिणारे कवी म्हणून दुर्लक्षित राहिलेले असा ज्यांचा उल्लेख देशपांडे यांनी केलेला आहे त्यांची एकही कविता प्रस्तावनेच्या मजकुरात उदाहरणासाठी देशपांडे यांनी घेतलेली नाही. आपली कविता काय आहे हे सांगण्याऐवजी काय नाही ते देशपांडे सांगतात. ते म्हणतात, 'ती एक मूड गिरवत गुंग करणारी नसते, संगीत लईच्या वापर ती फारसा करीत नाही, ती एखाद्या अनुभवाचा प्रत्यय देणारी नसते, रुटीन सुखदुःखाचे सामान वापरत हसू व रडू निर्माण करण्यात तिला रस नसतो, ती कोणत्याही व्यावहारिक कृतीला प्रवृत्त करत नाही' वगैरे.

अशा कवितेचे समीक्षण करताना कुणी 'ही सगळी भरल्या पोटाची करमणूक आहे' असं म्हणालं तर देशपांडे अशा समीक्षकांना बाजारबुणगे, आत्ममग्न, सुखासीन विद्वान अशी शेलकी विशेषणे लावतात. आणि तरीही वर आपल्या कवितेवर काहीही प्रतिक्रिया आली तरी तिचा प्रतिवाद करत बसू नये असा सल्ला कवींना देतात. अशा परस्पर विसंगतीने ही प्रस्तावना भरलेली आहे. कारण अशी अकविता लिहिणारे कवी 'तिकडं बाहेर देशात मार्क्सवादी आहेत' असा तपशील पुरवून या विद्वानांचा प्रतिवादही करताना देशपांडे दिसतात.

भालचंद्र नेमाडे यांच्यावर देशपांडे यांचा राग दिसतोय. पण त्यांचे नाव न घेता ते त्यांना देशीवादावरून टोमणे मारतात. मतभेदाची निर्मळ समीक्षा आणि ही हेत्वारोपाची कलुषीत समीक्षा यात फरक असतो. नेमाडे यांची डॉ. सुधीर रसाळ यांनी केलेली समीक्षा ही मतभेदाची निर्मळ समीक्षा आहे. तो तोल देशपांडे यांना सांभाळता आलेला नाही. स्वतःच्या कवितेच्या टीकाकारांविषयी लिहिताना देशपांडे यांना आपले विकार आवरता आलेले नाहीत. त्यामुळे असा त्यांच्या भाषेचा तोल अनेक ठिकाणी गेलेला दिसतो. त्यामुळे या समीक्षेची भाषा निरपेक्ष न राहता ती स्वसापेक्ष होतांना दिसते.

एका बाजूला सर्व पारंपारिक कविता मोडीत काढताना दुसऱ्या बाजूला समाज माध्यमातल्या कवितेच्या लोंढ्याविषयी ते स्वागतशिल आहेत. त्यातूनच चांगली अकविता पुढे येण्याची शक्यताही त्यांना वाटते. मराठी लोककवितेविषयी आणि बहिणाबाईविषयी त्यांनी काहीही लिहिलेले दिसत नाही. कदाचित त्यांना ते सगळेच फार प्राथमिक स्वरूपाचे काव्य वाटत असावे. कारण त्यात तर राग -लोभ, भाव-भावना, सुख-दुःख, देव-धर्म, नाती-गोती याशिवाय अन्य काहीही नसते. त्यासोबतच आमच्यासारखे लोकधर्मी कवीही त्यांच्या कक्षेबाहेरच असणार.

मला मात्र त्यांची कविता वाचायला आवडते. देशपांडे यांचा कवितासंग्रह निघाला नसावा असे मला वाटत होते. पण इथे त्यांनी दिलेल्या स्वतःच्या कवितेच्या उदाहरणाखाली त्यांच्या संग्रहाचा उल्लेख असल्यामुळे तो प्रकाशित झालेला असावा. पण मला पुस्तकांच्या दुकानात कुठे तो मिळाला नाही. त्यामुळे वाचता आला नाही. पण सत्यकथेतील कवितेच्या दोनही खंडात त्यांची विपुल कविता निवडण्यात आलेली आहे. तितक्या अन्य कुणाच्याही कविता त्या खंडात पाहायला मिळत नाहीत. तिथली त्यांची ती कविता मी मोठ्या आवडीने वाचलेली आहे. मराठी कवितेचा एक आस्थावान वाचक म्हणून मराठीत सर्व प्रकारची कविता लिहिली जावी असंच मला वाटत असतं.

देशपांडे यांच्या या समीक्षा लेखनात इंग्रजी उतारे भरपूर आहेत. त्यांचा मराठी अनुवाद मात्र ते देत नाहीत. माझ्यासारख्या इंग्रजी मुळीच न समजणाऱ्या वाचकांची त्यामुळे मोठीच अडचण होते. कदाचित आमच्यासारखे वाचक देशपांडे यांना अपेक्षितच नसावेत. इंग्रजीचे जाणकार वाचकच त्यांना अभिप्रेत असावेत.

हा जो सगळा मजकूर मी लिहितोय तो या पुस्तकाच्या शंभरपानी प्रस्तावनेविषयीच आहे. या शंभर पानात अनेक वेळा विचारांची पुनरुक्ती झालेली दिसते. या एकूण शंभर पानांचे सार लेखकाच्या खालील एक दोन उताऱ्यात सामावलेले आहे, असे आपल्या लक्षात येते. उदाहरणार्थ,

"इथले कवी मुळातच कविता लिहितात ते कवी म्हणून ओळखले जाण्यासाठी, तशी मान्यता मिळवण्यासाठी, मोठे कवी म्हणून टिकून राहण्यासाठी आणि जन माणसाचा आदर मिळवून आत्मतूष्ठ होण्यासाठी. याचाच अर्थ कविता लिहिण्याचा मूळ हेतूच कविताबाह्य असतो. त्यामुळे सहाजिकच मग रुटीन सामान्य अनुभव, विचार, नीती, कल्पना, न्याय, समता वगैरे अभिलाषित मूल्य, भावभावनांचे पुनःप्रत्यय आणि थोडीफार चकित करणारी तंत्रकौशल्य या मर्यादेत ही कविता खेळत-बागडत राहते. अगदी तथाकथित दुःखाची कविताही. एकदा उद्दिष्ट कविताबाह्य मान्यतेचे असले की पुनरावृत्ती हे एकच कवितेचे कार्यक्षेत्र बनते. मग भाषेवर आणि तंत्रावर हुकूमत असलेले काही कवी इथे निव्वळ विविध गुणदर्शन दाखवत अमर होतात. त्यांच्या कवितेत सलग गांभीर्य कसलेच नसते. पार अनिलबिनीलांपासून उदात्त अशा कुसुमाग्रजांपर्यंत. यांना जगण्याबाबत एकही समस्या सखोलपणे दिसत नाही, कारण पहायचीच नसते. कमी कुवतीचे रटाळ, सेफ जगणे हीच एक आस असल्यावर जनमान्य मार्गाने आयुष्य रेखाटत जाणे हे बंधनकारक ठरते. जनमान्य दुःखाचा मोफत डोस आणि जनमान्य अस्मितांचे उदात्तीकरण यात हे कवी रमतात. त्यांना स्वतःला एखादे दुःख महत्त्वाचे वाटले, मुळापासून त्याकडे पहावेसे वाटले, असे घडत नाही. कुसुमाग्रज इथले प्रतिनिधिक भाषा पुढारी होतात - त्यांच्या नावे भाषादिन साजरा होतो, हा याचा पुरावा आहे. हे असले कवी धर्म, भक्ती, प्रेम, अस्तिक, नास्तिक, वारकरी, शूर, देशभक्त, बांधिलकी, युद्धसमर्थक असे सगळे

असतात. या प्रत्येक विभागातल्या कविता लिहून ते लोकप्रिय होत राहतात. थोडक्यात म्हणजे यांना कशाचेच फारसे गांभीर्य नसते आणि कोणत्याही समस्येला सामोरे जायची आचही नसते."

"बुद्धीची प्रत्येक गोष्ट द्वंद्वयुक्त असल्याने, समतावादी हेच विषमतावादी असतात, शांततावादी हेच युद्धवादी असतात आणि नीतीवादी हेच अनीतीवादी असतात - हे समजून घ्यायला हवे."

"चांगली म्हटली जाणारी काही साहित्य निर्मिती सर्वसामान्य माणसाचा विचार करत नाही, ती त्याच्यापर्यंत पोचू शकत नाही, अशी एक तक्रार केली जाते. 'सर्वसामान्य' माणूस कोण ? भाषाच न येणे, वाचायचा उत्साहच नसणे, या गोष्टी सोडून देऊ. 'सर्वसामान्य' माणूस म्हणजे मुख्यतः स्वतःच्या मानसिक सवयी घट्ट पकडून बसणारा, वेगळे काही रिसिव्ह करायलाच तयार नसलेला माणूस, हे लक्षात घ्यायला हवे. सर्जक साहित्यकृती ही कुठल्याही मानसिक सवयीची गुलाम नसते. ती त्याच्या पर्यंत पोहोचत नसेल तर कारण स्पष्ट आहे - सर्जकताच नाकारणारे मन ! अशा कर्मकठीण माणसांना तर सर्जक जगणेही उपलब्ध नसते ! सर्जक जगणे म्हणजे माणसाच्या मानसिक सवयींनी पूर्णतः बद्ध नसणे"

हे उतारे वाचल्यानंतर त्यावर मी काही भाष्य करण्याची गरज नाही. देशपांडे यांच्या मताचे स्वरूप आपल्या सहज लक्षात येते. देशपांडे यांच्या मते अकविताच फक्त समग्रावधानी म्हणजे सर्वश्रेष्ठ असते. इतर समग्र मराठी कविता ही शूद्र स्वरूपाची आहे. याचा निष्कर्ष असा की, 'समग्र मराठी कविता शूद्र स्वरूपाची आणि एकट्या चं. प्र. देशपांडे यांची कविता समग्रावधानी. आणि त्यांची ती अकविताच फक्त सर्वश्रेष्ठ' शंभर पानाच्या या प्रस्तावनेतून माझ्या प्रत्येयाला आलेला हा निष्कर्ष.

अंगाई गीतांपासून ते मर्तीकाच्या गाण्यापर्यंत समाजाची शेकडो प्रकारच्या कवितेची गरज असते. कविता ही इतकी विविधरुपीनी आहे की कवितेचा हा एकच प्रकार सर्वश्रेष्ठ म्हणणे हे अहंकारी अज्ञानच म्हणावे लागेल. शास्त्रीय संगीताचे महत्त्व सांगताना लोकगीतांपासून सर्व संगीत प्रकार नाकारणे आणि शुद्ध शास्त्रीय संगीताचाच केवळ आग्रह धरणे हे जसे अहंकारी अज्ञान असते, तसेच अकवितेलाच शुद्ध समग्रावधानी कविता म्हणण्यातही असते. आमच्या कवितेचे कौतुक होत नाही, आम्हाला बेदखल केलं जातं असं पालूपद या लेखनात आहेच. या दीर्घ प्रस्तावनेच्या मूळाशी हेच कारण असावं. अशी शंका घ्यायला पुष्कळ वाव आहे. आणि तसं असेल तर या लेखनाला दिलेला तात्विक मुलामा थकलादुच म्हणावा लागेल.

चंप्र हे नाव तसं खूप मोठं आहे. या लेखनामागेही लेखकाची खूप मेहनत आहे. साधना आहे. पण हे लेखन खूप विस्कळीत आहे. तसं ते आहे हे लेखक आधीच कबूल करतोय. देशपांडे यांनी त्यांच्या सत्यकथेतल्या चाळीसपन्नास वर्षांपूर्वीच्या टिपणापासून ते आजच्या फेसबुकवरील टिपणापर्यंत, सगळं जशाला तसं इथं घेतलय. अलीकडच्या काळात चं. प्र. देशपांडे यांनी आपली जुनी नाटकंही पुनर्प्रकाशित करताना त्यांचं पुनर्लेखन केलेलं आहे. तसं या सगळ्या लेखनाचं केलं असतं तर फार बरं झालं असतं. त्यामुळे पुनरुक्ती टळली असती. विचारांची स्पष्टता आली असती. हे पुनर्लेखन करताना देशपांडे यांनाच यातला पुष्कळ मजकूर हटवावासा वाटला असता. त्यांच्या नाटकाच्या पुनर्लेखनात त्यांनी तसे केल्याचं म्हटलेलं आहे.

सुरुवातीच्या १०० पानाच्या प्रस्तावनेनंतर १३० पाने मराठीतल्या काही अकवितांच्या विवेचनांची आहेत. सुरुवात मर्ढेकरांपासून होते. त्याआधीची एकही कविता या योग्यतेची नाही असा याचा अर्थ होतो. 'जगण्याचा लिप्ताळा' असे मर्ढेकरांच्या इथे निवडलेल्या कवितेचे शीर्षक आहे. अर्थात मरढेकरांच्या कवितेचे शीर्षक म्हणजे त्या कवितेची पहिली ओळ असते. मर्ढेकरांची ही एकमेव कविता देशपांडे यांना त्या योग्यतेची वाटते. तीही त्यांच्या हातून नकळत लिहिल्या गेली असावी, असे देशपांडे यांना वाटते. मर्ढेकरांच्याही इतर बहुतेक कविता प्रतिक्रियात्मकच आहेत, असंही ते लिहितात.

आरती प्रभू यांची 'आवर्तने द्रुत शून्याची' ही कविता देशपांडे यांना आवडलेली आरती प्रभूंची एक कविता आहे. आरती प्रभू यांनी स्वतः आणि श्री. पु. भागवत या चिकित्सक प्रकाशकाने कोणत्याही संग्रहात घेण्याच्या योग्यतेची नाही म्हणून बाजुला ठेवलेली, पूर्वी कधीतरी सत्यकथेत प्रकाशित झालेली ही कविता देशपांडे यांना आरती प्रभूंची समग्रावधानी कविता वाटते. आरती प्रभूंच्या याच कवितेच्या शीर्षकातील 'आवर्तने' हा शब्द देशपांडे यांनी या पुस्तकाच्या शीर्षस्थानी ठेवलेला आहे.

पुढे अशाच आणखी काही कविता घेऊन देशपांडे यांनी त्या कवितांची विवेचन केलेले आहे. रसग्रहण हा शब्द देशपांडे यांना मान्यच नाही. रस, रसिकता, रसग्रहण हे सगळेच शब्द त्यांना फालतू वाटतात. त्यांनी निवडलेल्या कवितांपैकी अनेक कविता मला सामान्य दर्जाच्या वाटल्या. देशपांडे यांना मात्र त्या कविता त्या त्या कवींच्या सर्वोत्कृष्ट कविता वाटतात. अर्थात त्यावर काही आक्षेप घेण्याचे कारण नाही. कारण देशपांडे हे सगळेच फार गांभीर्याने करत आहेत, याविषयी मला शंका नाही.

वर्णमुद्रा प्रकाशनाने पुस्तक फारच भारी काढलेले आहे. पूर्वी मौज, पॉप्युलर अशी पुस्तकं करायचे. त्यांनी आता अशी पुस्तकं करणं बंद केलेलं आहे. चंद्रमोहन कुलकर्णी यांचे मुखपृष्ठ आहे. ते मजकूराला न्याय देणारं असतंच.

□

साधक-बाधक होत राहणार, हे मान्य ! या दीर्घ अभिप्रायाबद्दल इंद्रजित भालेराव यांना धन्यवाद !

बाकी स्थगित ठेवले तरी -- समजा या लेखनाला ' गद्य कविता ' म्हटले तर रसाळ सरांना आशयाबद्दल काय वाटू शकेल याबद्दल उत्सुकता वाटते. – ( लाख्यांची कवितेबाबत पोस्ट ).

अक्षरांचा रंग, मुखपृष्ठ व ब्लर्ब यांची मांडणी -- हे सर्व सुशील शिरसाठ यांचे आहे.

सुमारे 50 वर्षे नाट्यलेखन करत आलो आहे. आशयाच्या पाण्यात उतरून त्यावर लिहिले गेलेले फारच थोडे आहे. हा लेख तसा आहे. त्यामुळे, लाखे मित्र असले तरीही, धन्यवाद !

' तंबाखूची टपरी ' हे माझ्या अनुसर्जित कविता संग्रहाचे नाव मी पेसोआ च्या कवितेवरूनच दिलेले आहे !

राज्य नाट्य मध्ये २० तारखेला -- हा प्रयोग ' अभिरुची ' ही संस्था करणार आहे. – ‘ ट्रायल ‘.

मला लोक म्हणतात, " हे बरे आहे तुमचे ! छंद हवाच असा काहीतरी वेळ घालवायला ! "

खरे तर लेखक वा प्राध्यापकांकडूनही असे वाचन अपेक्षित नाही -- तसे म्हणण्या ऐवजी हे टिपिकल आहे ! शिवाय ठिकठिकाणी बोलत असताना मी निरनिराळे मुखवटे धारण करतच असतो ! एखादा माणूस सदोदित खरा असण्याचा क्लेम करत असेल तर तो खोटे बोलत असतो ! शिवाय, आपण सदोदित नॉन-टिपिकल आहोत असे दाखवत/म्हणत बसायची मला गरज वाटत नाही ! शिवाय तुम्हाला जे जमते ते मलाही जमलेच पाहिजे, अशी माझी महत्त्वाकांक्षाही नाही ! यात सगळे आले !

अपूर्णतेच्या जाणिवेचा दंश आणि तरीही असणारी सातत्याची इच्छा -- सारखे, पेन चालते आहे का ते तपासात बसणे -- त्या कृतीतून येणाऱ्या शब्दांना किती महत्त्व द्यावे -- या प्रश्नातून येणारी परात्मता. मनाच्या एका जटिल अवस्थेची अभिव्यक्ती. – राहुल पुंगलियांची  कविता.

व्यापक आवाक्याचा लेखक ! --- रवींद्र पांढरे.

आमचा हा मजेदार मित्र -- कवी, फोटोग्राफर आणि हरहुन्नरी मित्र गेला ? ' प्रत्यय ' चे सुरुवातीचे दिवस आठवले ! स्मृतीस अभिवादन ! – चंद्रकांत कल्लोळी.

या महाग्रेट कवीला हार्दिक वंदन ! – गालिब.

'चार पुरुषार्थांची चार नाटके ' हे पुस्तक लेखक / नाटककार चं .प्र .देशपांडे यांच्या अनुक्रमे धर्म (ढोलताशे ) , अर्थ (इराक ) , काम (बुद्धी बळ आणि झब्बू ) , मोक्ष (जणू काही वास्तव ) या थीम्स वर बेतलेली नाटके आहेत . 'ढोलताशे' व 'जणू काही वास्तव'  चा आत्मा फिलॉसॉफिकल आहे परंतु ते सादर होताना पात्रांमधील चर्चा  रंजक होतील असं पाहिलं आहे . पण मुळात कथेचा आशय हा गहन तत्वज्ञानावर  आधारित असल्याने विनोदी नाटकातील नव-याची वारंवार होणारी फजिती वगैरेंच्या स्वरूपाचे ठराविक संवाद मिळणार नाहीत . वरती रंजक म्हटलंय  म्हणजे  जे काही ह्युमर आहे ते नैसर्गिक ,आणि काळाला धरून आहे आहे .  पुस्तकाच्या २९५-२९६ या दोन पानांवरील (नाटक : 'जणू काही वास्तव') कॅरॅक्टर नम्रता च्या तोंडी जे संवाद दिले आहेत ते वाचून मला चं.प्र यांच्या पायावर डोकं ठेवावे असेच वाटले . मानसशास्त्र ,शरीरशास्त्र , अध्यात्म , योग या सर्वाचं त्यांनी केलेलं इंटिग्रेशन हे

अफलातून आहे . हे दोन चांगले मोठे पॅराग्राफ आहेत . यात सर्व गुंता त्यांनी समर्थपणे उलगडून दाखवला आहे .
This is worth a read !
या उलट इराक (थीम 'अर्थ' ) आणि , बुद्धी बळ आणि झब्बू (थीम 'काम' ) हि दोन नाटक टोकाची मटेरियलिस्टिक आहेत . 'बुद्धीबळ आणि झब्बू' मध्ये स्त्री पुरुष एकमेकांना आकर्षित करण्याकरिता कसे हळूहळू अड्वान्समेंट करीत असतात हे वाचाल तर हाच तो 'ढोलताशे' वा 'जणू काही वास्तव ' चा लेखक असेल हे पटतच नाही. इथे चं.प्र. 'छोटी सी बात' मधील कर्नल ज्युलियस नागेंद्रनाथ विल्फ्रेड सिंग जास्त वाटतात . झुडुपा आडून किंवा मॉल मधील फूड पार्क मध्ये गुपचूप कॅमेरे लावून त्यांनी प्रियंकारांत चाललेले संभाषण रेकॉर्ड वगैरे करून संवाद लिहिलेत कि काय देव जाणे .एकूणच सांप्रत काळात नात्यांमधील वाढत चाललेलं dis-satisfaction काय रूप घेतंय हे यात छान पाहायला मिळेल . 'इराक ' हे पूर्णपणे राजकारण बेस्ड आहे . आणि अफाट आहे .
चं .प्र सारख्या अत्यंत प्रगल्भ ,विद्वान आणि व्यासंगी व्यक्तीची या माध्यमातून वेगळी ओळख झाली , पुस्तक रुपी आशीर्वाद मिळाला त्याबद्दल आनंदी आहे .

वा ! अभिप्रायाबद्दल धन्यवाद !

Sharad Deshpande प्रकाशक मीच आहे -- पुस्तकाची किंमत रु.६००/-- असून सवलतीत रु.४५०/-- ( पोसटेजसह ) आहे. रक्कम पाठवण्यासाठी --
Chandrakant Prabhakar Deshpande
HDFC BANK Saving Account No.03591000003204
IFSC : HDFC0000359
For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR
UPI ID gathaent-3@okhdfcbank
Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

माझे ' समतोल ' म्हणजेच, ' ए, आपण चहा घ्यायचा ? ' हे नाटक पाहून एका स्त्री प्रेक्षकाने विचारले होते की, " तुम्हाला स्त्रीचे मन इतके कसे समजते ? " याचे उत्तर काय ? सगळ्या पात्रांची मने वेगवेगळीच असतात -- ती कशी समजतात ? अशा सगळ्या प्रश्नांचे एकच उत्तर -- स्वत:चे मन समजणे आणि निरीक्षणे यांचे एकीकरण !
३१-१२-२०२३.